MHWS080022942025

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दि. | : | २८.०४.२०२५ |
| खटला नोंदणी दि. | : | २८.०४.२०२५ |
| निकालाचा दि. | : | २१.०७.२०२६ |
| कालावधी | : | ०१व.०२म.२३दि. |

भाग अ

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३), रिसोड, ता. रिसोड,
जि. वाशिम यांचे न्यायालय
(पिठासीन अधिकारीः श्री. किरण दिपक लुकडे)

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३७०/२०२५ निशाणी क्र.१२

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन<br>मार्फत – पोलीस ठाणे अंमलदार,<br>महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन शिरपूर जि. वाशीम. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | श्री. एम. डी. अडकिने |
| विरूध्द | |
| आरोपी | संजय संपत इंगळे<br>वय – ५७ वर्षे, धंदा - मजुरी,<br>रा.केनवड ता. रिसोड, जि.वाशिम. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री.एस.व्ही बाजड |

भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २७.०३.२०२५ |
| गुन्हा दाखल दिनांक | २७.०३.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २५.०४.२०२५ |
| विवरण पत्र तयार केल्याचा दिनांक | २६.११.२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०९.०२.२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | २१.०७.२०२३ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २१.०७.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | --- |

आरोपीची सविस्तर माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीना वर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय संपत इंगळे | कलम ३५ (३) भा.ना.सु.सं. प्रमाणे नोटीस | २६.११. २०२५ | कलम ६५ ई महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ | निर्दोष | - | - |

न्यायनिर्णय

**( दि.२१.०७ .२०२६ रोजी घोषित )**

प्रस्तुत आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम १९४९ कलम ६५ ई अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री.एम.डी. अडकीने व आरोपीतर्फे त्याचे विधीज्ञ एस. व्ही बाजड यांचा युक्तीवाद ऐकला.

२) अभियोग पक्षाच्या कथनावरुनक व आरोपीवरील दोषारोपावरून खालील मुद्दे निघाले व त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, आरोपी हा दिनांक २७.०३.२०२५ रोजी १५.३० वाजताच्या सुमारास ग्राम केनवड , रिसोड ता.रिसोड जि.वाशिम येथे विना परवाना बेकायदेशिररित्या दारुची विक्री करीत होता व त्याच्या जवळुन देशी दारू भिंगरी संत्रा कंपनीचे १८० मिलीचे ८ नग ज्याची अंदाजे किंमत ८००/- रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला, म्हणून त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | ... नकारार्थी. |
| २) काय आदेश ? | ... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

**: <u>कारणमीमांसा</u> :**

३) आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ व जप्तीपंच सा.क्र.१ संदिप अशोक जाधव नि क्र. ८ लगत व सा.क्र.०२ अनंत भाउराव बुटाले यांची साक्ष नि.क्र.८ खाली नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ खालील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द अभियोग पक्षाच्या पुराव्यादरम्यान विपरीत कथन न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ नुसार निवेदन वगळण्यात आले.

**<u>मुद्दे क्र.१ बाबत:</u>**

४) आरोपीवर असा आरोप ठेवण्यात आला आहे की, आरोपी हा दिनांक २७.०३.२०२५ रोजी १५.३० वाजताच्या सुमारास ग्राम केनवड , रिसोड ता.रिसोड जि.वाशिम येथे विना परवाना बेकायदेशिररित्या दारुची विक्री करीत होता व त्याच्या जवळुन देशी दारू भिंगरी संत्रा कंपनीचे १८० मिलीचे ८ नग ज्याची अंदाजे किंमत ८००/- रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला, म्हणून त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला

५) सदर घटनेबाबत ना.पो.का. गुरूदेव वानखेडे पोलीस स्टेशन, शिरपूर येथे फिर्याद दिली व त्यानुसार गु.र.क्र.१५२/२०२४ नोंदविण्यात आला. तसेच घटनास्थळ पंचनामा तयार केला. तपासादरम्यान आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने तपासीक अधिकारी गुरुदेव दयाराम वानखेडे पोलीस स्टेशन, शिरपूर यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

६) खटल्या दरम्यान सा.क्र.१ संदिप अशोक जाधव व सा.क्र.०२ अनंत भाउराव बुटाले यांची साक्ष नि.क्र.८ या घटनास्थळ पंचनाम्यावरील पंचांना अभियोग पक्षाने तपासले परंतु त्याने त्यांच्यासमक्ष आरोपीजवळुन दारु जप्त केल्याचे व त्याबाबत पंचनामा केल्याचे नाकारले आहे. अभियोग पक्ष हा आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी इतर कुठलेही साक्षीदारास तसेच फिर्यादीस तपासु शकलेला नाही. अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली असता अभियोगपक्षाने रासायनिक पृथकरणाचा अहवाल दाखल केला नाही. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय यांचा **नाजुक सिताराम माडवी वि. महाराष्ट्र सरकार, २०१९ एस. सी. सी. ऑनलाईन बॉम ५४८५** या केसमधील न्यायनिवाडा पाहता त्यामध्ये जप्त दारु ही नेमकी दारुच होती हे अभियोगपक्षाने

रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल दाखल केलेला नसल्यामुळे सिध्द झालेले नाही, असे सांगितले आहे. त्या अनुषंगाने सदर केसमध्ये रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल दाखल केला असला तरी जप्त मुद्देमाल दारु होती हे दाखवण्यासाठी सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सगळयात महत्वाचे म्हणजे रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल नसल्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल व त्यातुन घेतलेले सँपल ही दारु होती हे स्पष्ट व संशयापलिकडे सिध्द झालेले नाही.

(७) अभियोग पक्ष हा फिर्यादी व इतर साक्षीदारास तपासु शकला नाही. अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीस दोषी धरण्या इतपत पुरेसा नाही. तसेच आरोपीच्या ताब्यातुन दारु जप्त केली हे सुध्दा सिध्द होवु शकलेले नाही. आरोपी हा घटनेच्या वेळी दारुची चोरटी विक्री करीत असल्याचा अभियोग पक्षाचा पुरावा विश्वसनीय नाही त्यामुळे अभियोग पक्ष हा आरोपी वरील दोषारोप हे संशयापलिकडे जावुन सिध्द करु शकलेला नाही. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदवून मुद्दा क्र.२ बाबत पुढील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आदेश

१) आरोपी **संजय संपत इंगळे** याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अंतर्गत ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपी याचे जामीनपत्र व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३) जप्त मुददेमाल अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, वाशिम यांच्याकडे नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही कराण्यासाठी पाठविण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७-अ नुसार पूर्तता करण्यासाठी रु. १५,०००/- चे वैयक्तिक मुचलका दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)

स्वा/-

**(श्री किरण दि. लुकडे)**
प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.३ रिसोड

दिनांक २१.०७.२०२६

**एस.सी.सी. ३७०/२०२५**

भाग क

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | संदिप उर्फ प्रदिप अशोक जाधव | घटनास्थळ पंच | ०८ |
| २. | अनंता भाउराव बुटाले | घटनास्थळ पंच | ०८ |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| ०९ व १० | घटनास्थळ पंचनामा |

ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १३०/२०२५ | देशी दारू भिंगरी संत्रा कंपनीचे १८० मिलीचे ८ नग ज्याची अंदाजे किंमत ८००/- रु. पोलिस स्टेशन शिरपूर यांच्या मालखान्यात जमा. |

स्वा/-

(श्री. किरण दिपक लुकडे )

दि. २१/०७/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

न्यायालय क्र.३,वाशिम

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Orders are same word for word as per original Judgment/ Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr. Clerk | : | S.M.Pandit (Jr Clerk) |
| Court Name | : | J.M.F.C. Risod. |
| Date | : | 21/07/2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer | : | 21/07/2026 |
| Judgment/Order Uploaded on | : | 21/07/2026 |